

९

# ।। तैसा हृदयामध्ये मी रामु ।।

**अश्रद्दधाना: पुरुषा धर्मस्यास्य परंतप।**
**अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनी।।३।।**

हे परंतप अर्जुना, या आत्मज्ञानरूप धर्मावर श्रद्धा न ठेवणारे लोक मला प्राप्त न होता मृत्युरूप संसारामध्येच भ्रमण करीत राहतात.

**पाहे पा दूध पवित्र आणि गोड। पासी त्वचेचिया पदराआड।**
**परि ते अव्हेरूनि गोचिड। अशुद्ध काय न सेविती?।।५७।।**

**का कमलकंदा आणि दर्दुरी। नांदणूक एकेचि घरी।**
**परि परागु सेविजे भ्रमरी। येरा चिखलुचि उरे।।५८।।**

**नातरी निदैवाच्या परिवरी। लोह्या रूतलिया आहाती सहस्त्रवरी।**
**परि तेथे बसोनि उपवासु करी। का दरिद्रे जिये।।५९।।**

**तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्वसुखाचा आरामु।।**
**की भ्रांतासी कामु। विषयांवरी।।६०।।**



**बहु मृगजळ देखोनि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळिता गळाळा।।**
**तोडिला परिसु बांधिला गळा। शुक्तिकालाभे।।६१।।**

**तैसी अहंममतेचिये लवडसवडी। माते न पवतीचि बापुडी।**
**म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडी। डहुळिते ठेली।।६२।।**

**येऱ्हवी मी तरी केसा। मुखाप्रति भानु का जैसा।**
**कही दिसे न दिसे ऐसा। वाणीचा नोहे।।६३।।**

सर्व संतमंडळींना ह. भ. प. दिनकरचे सप्रेम नमस्कार! आजच्या आपल्या प्रवचनसेवेचा विषय आहे 'तैसा हृदयामध्ये मी रामु'. श्रीमद् गीता-ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील श्लोक क्र. ३ आणि त्या अनुषंगाने आलेल्या ओवी क्र. ५७ ते ६३ अशा सात ओव्या आताच आपण ऐकल्यात. हा नववा अध्याय म्हणजे राजविद्या राजगुह्ययोग, या नावाचा आहे.

आता महाराज, काही भक्तांना प्रश्न पडतो की, राजविद्या म्हणजे काय? राजगुह्य म्हणजे काय? काहीजण तर याचा राजाची विद्या व राजाचे गुह्य असा सरळ अर्थ लावतात! राजविद्या म्हणजे सर्व विद्यांमध्ये राजा असणारी विद्या किंवा सर्वश्रेष्ठ विद्या! आणि राजगुह्य म्हणजे सर्व गुह्यांचा राजा किंवा सर्वश्रेष्ठ गुह्य होय.

भगवंत येथे ज्ञान हे विज्ञानासह स्पष्ट करून सांगत आहेत. ते जे आत्मज्ञानरूप ज्ञान सांगत आहेत ते सर्वश्रेष्ठ असे आहे. ते परब्रह्मस्वरूप आहे. ते प्राप्त झाले असता आनंद, आनंद आणि आनंदच असतो. ते ज्ञान सांगताना भगवंत स्वत:च पार्थास म्हणतात की, 'तुझ्या मनात अशी शंका येईल की, जे लोक क्षुद्र बाबींसाठी जळत्या आगीत उडी टाकायला मागेपुढे पाहत नाहीत, ते अनायासे मिळणाऱ्या ब्रह्मसुखाची गोडी का म्हणून सोडतील? पवित्र, रम्य, सुखकारक साधनांनी प्राप्त होणारे, जाणावयास सोपे, अतिसुखदायक, धर्माला अनुकूल असे आपल्याच

ठिकाणी असणारे ज्ञान व त्यातून मिळणारे परब्रह्मीय सुख, हे लोकांना का मिळत नाही, हे सांगताना भगवंतांनी तिसरा श्लोक प्रगट केला आहे. त्यात त्यांनी आत्मज्ञानरूप धर्मावर श्रद्धा नसलेले लोक जन्ममृत्युरूपी संसारात भ्रमण करीत राहतात, असे त्याचे कारण सांगितले आहे. भगवंतांच्या या श्लोकावर भाष्य करीत असताना, ही प्रगाढ तत्त्वज्ञानाने परिपूर्ण अशी ओवी ज्ञानेश्वर माऊलींनी प्रगट केली आहे.

**तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्व सुखाचा आरामु।**
**की भ्रांतासि कामु। विषयांवरी॥६०॥**

ही रत्नकोंदणात सजवून सर्वांना दृष्टिगोचर होईल, अशी ठेवण्यासारखी ओवी आहे. या ओवीतील प्रतिपाद्य विषय अधिक स्पष्ट समजावून सांगण्यासाठी या ओवीच्या मागे आणि पुढे अशा सहा ओव्या प्रगटल्या आहेत.

त्याप्रमाणे मानवाच्या सर्व सुखांचे विश्रांतीस्थान असा मी राम म्हणजेच आत्माराम मी हृदयात असताना भ्रांत माणसाची कामना विषयोपभोगाकडे असते.

परमात्म्याचा अंश जो जीवात्मा तो सर्वांच्या हृदयात विराजत असतो. त्याच्या हृदयात असण्यामुळेच माणूस 'जिवंत' या संज्ञेस पात्र होतो. ज्याक्षणी तो जिवात्मा हृदयातून निघून जातो, त्या क्षणीच मानवी देहास 'मृत' ही संज्ञा प्राप्त होते. तर जो आत्माराम हृदयात असतो, तोच सर्व सुखांचे घर असतो. तो सत्-चित-आनंद असतो. तोच मानवाचे खरे स्वरूप असतो. त्यास जन्म-मृत्यु-जरा-व्याधी असे काही असत नाही. दुःखाचे तर नावही असत नाही. त्याच्या रूपात परमात्माच अंश रूपाने जीवात वास करीत असतो. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व सुखे म्हणजे मायानिर्मित सुखे, ज्यांच्यापुढे काहीही नाहीत अशा सर्वोच्च सुखाचा कंद असणारा जो आत्माराम आहे, त्याची जाणीव मानवास होत नाही. त्या हृदयस्थ परमेश्वरास कर्म-भक्ती-ज्ञान यांच्या सहाय्याने



जाणून दिव्य अशा आपल्या मूळ स्वरूपात म्हणजेच परमेश्वर स्वरूपात मिळून जाऊन सच्चिदानंद व्हायचे सोडून मानव मायानिर्मित भौतिक जगतात सुख शोधीत राहतो. तो असे का करतो? तर तो भ्रांत असतो. म्हणजेच अज्ञानी असतो. बाह्य सृष्टीतच खरे सुख आहे, असे त्यास वाटत असते. जे जसे नाही ते तसे आहे, असे भ्रामक चित्र माया दाखवित असते. त्यामुळेच जीव भ्रांत होत असतात. भ्रांत जिवास क्रांत करून आत्मस्वरूपी विश्रांत करण्याची किमया सद्गुरू करतात. फक्त गरज असते ती भक्तीची. सद्गुरू आज्ञा मानून त्यांच्या मार्गदर्शनानुसार भौतिक सृष्टीतील असंख्य विषयोपभोगाकडे धावण्याच्या क्रियेस मुरड घालून ती परमेश्वर भक्तीकडे वळण्याची विश्वव्यापी परमात्मा अणुरेणू व्यापूनही पुन्हा अनंत असतो. तोच जिवात्म्याच्या रूपाने मानवाच्या हृदयातही वास करीत असल्याने विश्वात्मक परमेश्वराशीही अतिसूक्ष्म रूपाने जोडलेला असतो. परंतु अज्ञानी जिवांना त्याची जाणीव नसते. सर्व सुखांनी जेथे आराम करावा, त्या हृदयस्थ परमात्म्याकडे जीव भ्रांत असल्याने दुर्लक्ष करून क्षुद्र विषयोपभोगाकडे धावत असतो.

पवित्र आणि गोड असे दूध आणि ते दूध ज्या गायीच्या कासेत असते, त्या कासेवर चिकटून वास्तव्य करणाऱ्या गोचिडाचे उदाहरण माऊलींनी दिले आहे. त्वचेच्या पदराआड असणारे अमृततुल्य दूध त्यागून गोचिड तेथील रक्त शोषते. रक्ताचा उल्लेख माऊलींनी 'अशुद्ध' असा केला आहे. दूधाच्या तुलनेत रक्त हे 'अशुद्धच' होय. त्या गोचिडाला भ्रांत असल्याने अमृततुल्य दूध त्वचेच्या पदराआड नजिकच आहे हे कळू शकत नाही. ते दूध हे अमृतच आहे, याचेही ज्ञान त्या गोचिडास नसल्याने ते प्राशण्याची त्यास इच्छा होऊ शकत नाही. अशुद्धासाठी कासेस चिकटून बसलेले गोचिड आणि संसाराशी आसक्त जीव हे एकसारखेच असल्याचे या उदाहरणाहून मानवाच्या मनावर चांगलेच ठसते. गोचिड अशुद्ध सोडून दुधाकडे लक्ष देत नाही आणि सांसारिक सुखे की जी दुःखात रूपांतरित होत असतात, ती सोडून स्वतःच्या हृदयात

असलेल्या 'रामु'स दुर्लक्षीत करणारे जीव हे खऱ्या चिरंतन सुखास पारखे कसे होतात, हे येथे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी दिलेल्या अगदी चपखल दाखल्यावरून दिसून येते.

गायी-म्हैसींचे पालन करून त्यांचे दूध डेअरीत विकण्याचा व्यवसाय करणारा एखादा दुग्धव्यावसायिक त्या दुधाच्या आलेल्या पैशातून काही पैशांची दारू पितो. जी सर्वार्थाने हानिकारक असते. दूध जे सर्वार्थाने लाभकारक असते आणि स्वत: त्याचा गायी-म्हैशीपालनाद्वारे उत्पादक असतो, ते दूध पिऊन आपले सर्वार्थाने कल्याण करावे, असे त्यास वाटत नाही. अमृताऐवजी हळूहळू विषाचा परिणाम करणारे रसायन तो घेतो, हे व्यवहारातील उदाहरण म्हणून देता येईल. त्याप्रमाणे सर्व सुखांचे आगर असलेल्या हृदयस्थ बाप रखुमादेवीवरुची भक्ती करायचे सोडून नको त्या ठायीची भक्ती जीव करीत असतो. म्हणून हृदयातल्या रखुमादेवीवराला जीव मुकतो.

विसाव्या शतकाच्या आरंभी घडलेली एक सत्यकथा मला या ठिकाणी स्मरते. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील थोर संत गजानन महाराज यांच्या कार्यकालातील 'श्री गजानन विजय' या ग्रंथात ही कथा आहे. हरी जाखडी नावाचा एक यजुर्वेदी ब्राह्मण गावोगावी फिरून आपले पोट भरीत असे. असाच फिरत फिरत तो शेगावात आला. श्री गजानन महाराजांचे दर्शन घेऊन त्यांच्या पायाशी बसला. हजारो लोक तेथे येऊन त्यांचे दर्शन घेत आहेत, कोणी नवस फेडीत आहेत तर कोणी भोजन घालीत आहे, हे त्याने पाहिले. आपणास यातील काहीच शक्य नाही. आपणाजवळ शेत, मळा दळा काहीच नाही. मला मुलगी तरी कोण देणार? त्यामुळे माझे लग्न कसे होणार? त्या हरी जाखड्याने मनातून स्वामी गजानन महाराजांची प्रार्थना सुरू केली. 'हे स्वामी गजानना, सच्चिदानंद दयाघना माझ्या मनात संसारसुखाची वासना निर्माण झाली आहे. मला सुंदर बायको मिळावी. धनसंपदा लाभावी. मुले-लेकरे



व्हावी.' अंतर्ज्ञानी संत गजानन महाराज त्याच्या मनातील इच्छा तात्काळ जाणते झाले. त्यांनी तुच्छतादर्शक अशी कृती केली आणि स्वत:शीच ते जे म्हणाले ते सांगताना संतकवि दासगणु महाराज म्हणतात,

**संसारापासून सुटावया। लोक भजती माझ्या पाया।**
**याने येथे येऊनिया। संसारसुख मागितले।।२३०।।**

**पहा जगाची रीत कैसी। अवघेच इच्छिती संसारासी।**
**सच्चिदानंद श्रीहरीसी। पाहण्या न कोणी तयार।।२३१।।**

**ऐसे आपणासी बोलले। पुन्हा जाखड्यासी पाहिले।**
**जे जे तू इच्छिले। सांप्रतकाली मनात।।२३२।।**

**ते ते अवघे होईल पूर्ण। पुत्र पौत्र तुजलागून।**
**होतील संग्रहासी धन। तेही थोडके राहील।।२३३।**

**- श्री गजानन विजय, अ. १९**

पहा महाराज, समोर सद्गुरू असताना त्यांना हरी जाखड्याने मागून मागून काय मागितले? त्याने काय मागायास हवे होते? सद्गुरूंची कृपा मागून श्रीहरी प्राप्तीची दीक्षा त्याने मागावयास हवी होती. त्यांच्या दीक्षेच्या एकाक्षराबरोबर हरी जाखडीच्या हृदयात असलेल्या सर्व सुखांच्या आत्मारामाचे दर्शन त्यास तात्काळ घडले असते आणि जन्ममरणाच्या चक्रातून सुटून तो आपले मूळचे स्वरूप जे परमेश्वर त्यास प्राप्त होऊन सच्चिदानंदात विरून गेला असता. पण त्या भ्रांत जिवाची कामना विषयांवर होती म्हणून त्यास हृदयस्थ रामाची प्राप्ती होऊ शकली नाही.

यासंदर्भातील दाखला देताना महाराज ज्ञानेश्वर माऊलींनी पुढे म्हटले आहे की, कमळाचा कंद आणि बेडूक यांचे राहणे एकाच चिखलरूपी घरात असते. परंतु कमळातील मकरंदाचे सेवन भ्रमर करतात आणि बेडकांना मात्र चिखलच शिल्लक राहतो. या दाखल्यामध्ये बेडकाचे उदाहरण

हे संसाररूपी चिखलात रुतून बसलेल्या मूढ जिवांचे प्रतिनिधित्व करते आहे. तर त्याच्या उलट भ्रमराचे प्रतिक हे ज्ञानकणांचा मधुर मकरंद सेवनाऱ्या भक्तांचे आहे. 'चिखल' हा असार बाब दर्शवितो तर 'पराग' हे सार गोष्ट दर्शवतो. आता येथे ज्ञानेश्वरी पारायण सुरू आहे. त्यानुषंगाने ज्ञानयज्ञाचे विविध कार्यक्रम चालू आहेत. त्यात सहभागी होऊन त्या अतिउच्च-परमेश्वरी ज्ञानामृताचा लाभ घेणारे, त्यातून आपल्यातील आत्मारामाचे दर्शन घडवून आत्मिक उन्नतीच्या उच्चतर मार्गावर जाणारे आपणासारखे संतसज्जन हे भ्रमराचे प्रतिक आहेत. तर टी. व्ही. वर, बाजारू गल्लाभरू क्षुद्र चित्रपट त्यातील ते उन्मादक अंगविक्षेप पाहत त्यातच गढून जाणारे आत्मारामापासून वंचित राहणारे आणि म्हणून अधोगतीच्या मार्गावर जाणारे जीव हे 'मकरंद' सेवण्याऐवजी चिखल खाणाऱ्या बेडकाचे प्रतिक आहेत.

या संदर्भातील तिसरा दाखला माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी जो दिला आहे तो दुर्दैवी माणसाचा. त्याच्या राहत्या घरात जमिनीखाली हजारो मोहरा पुरून ठेवलेल्या असतात. पण त्याला त्याचे ज्ञान नसते. त्या घरात उपवासी बसून तो दारिद्र्यात होरपळविणारे जीवन जगत असते.

हा दाखला भक्तीपासून - संतमार्गापासून - ज्ञानमार्गापासून दूर असणाऱ्या प्रत्येकास लागू होतो. फारच थोडे लोक या मार्गावर येतात. त्यातील टिकतातही थोडेच. आणि जे कट्टरतेने भ्रांतीपासून स्वत:स दूर ठेवतात तेच हृदयस्थ आत्मारामाचे दर्शन घेऊ शकतात. परमेश्वर स्वरूप होऊन सच्चिदानंद पद भोगतात. उरलेले सर्व लोक अज्ञानावरणातच राहतात. धनखजिना नजिक असून देखील अज्ञानामुळे त्यास तो प्राप्त होत नाही. जे गुरूभक्तीच्या मार्गावर असतात त्यांना मात्र कधी ना कधी 'हृदयस्थ' आत्मारामाचे ज्ञान होण्याची शक्यता असते. त्यांच्या भक्तीमुळे त्यांना सद्गुरू भेटून त्यांना गुरूदीक्षा मिळण्याची दाट शक्यता असते.



'श्रीगुरूचरित्रा'च्या अठराव्या अध्यायात एक छान कथा आहे. त्यामध्ये एका दरिद्री वेदाभ्यासक भक्ताची कथा आली आहे. अमरापुरात राहणारा तो द्विज आपण व आपले कुटुंब यांचे पोषण, बहुतांश काळ, भिक्षेवरच करी. ज्यावेळी त्यास भिक्षा मिळत नसे त्यावेळी त्याच्या दारात लावलेल्या आणि बऱ्याच विस्तारलेल्या घेवड्याच्या वेलास लगडलेल्या शेंगांची भाजी करून भागवित असे. श्रीगुरू नरसिंह सरस्वती दत्तगुरू अमरापुरात भिक्षा मागण्यास जात असत. एके दिवशी श्रीगुरू त्या द्विजाच्या घरी भिक्षा मागण्यासाठी गेले. त्या द्विजाने श्रीगुरूंची पूजा केली. त्या घेवड्याच्या शेंगांची भाजी त्यांना अर्पण केली. भिक्षा आटोपून श्रीगुरू घराबाहेर पडले. जाता जाता संपूर्ण अंगण व्यापलेला तो घेवड्याचा वेल त्यांनी मुळातून छेदून टाकला आणि ते संगमावर निघून गेले. आपले उदरनिर्वाहाचे साधन गेले म्हणून द्वीज व कुटुंबिय अर्थातच दु:खी झाले. त्यांनी तो वेल गोळा करून टाकला. उरलेले खोल मूळही खणून टाकावे म्हणून त्या द्वीजाने ती जागा उकरण्यास सुरवात केली. त्या वेलाचे मूळ खणताच काय झाले ते सांगताना सरस्वती गंगाधर म्हणतात,

**काढिता वेल मुळासी। लाधला कुंभ निधानेसी।**
**आनंद झाला बहुवसी। घेऊनी गेला घरात।।६२।।**
**म्हणती नवल काय वर्तले। यतीश्वर आम्हा प्रसन्न जाहले।**
**म्हणोनि ह्या वेला छेदिले। निधान लाधले आम्हासी।।६३।।**

**- श्रीगुरूचरित्र, अ. १८ वा.**

त्यांच्याच पूर्वजाने त्यांच्याच अंगणात पुरून ठेवलेल्या धनखजिन्याचे ज्ञान त्या द्विजास नसल्याने तो दारिद्र्याचे जीवन तेथे जगत होता. श्रीगुरूकृपा होताच त्याचा दारिद्र्य वेल खांडिला गेला. त्याचे दारिद्र्य नष्ट झाले.

ही कथा येथे सांगण्याचे प्रयोजन एवढेच आहे की अशा प्रकारे आपण आपल्याच हृदयातील असलेल्या 'रामा'पासून, संसारवेलरूपी

भ्रांतीच्या विळख्यात सापडल्यामुळे दुरावलेले असतो. गुरूभक्तीमुळे कधी ना कधी कृपा होऊन अज्ञानरूपी वेल खांडिला जाऊन आपणास आत्मारामाचे दर्शन घडू शकते.

**तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्व सुखाचा आरामु।**
**की भ्रांतासी कामु। विषयांवरी।।**

या प्रवचनसेवेसाठी घेतलेल्या, ओवीच्या विश्लेषणार्थ माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी अगोदर प्रगट केलेल्या तीन दाखल्यांचा उहापोह आतापर्यंत आपण केला. त्यामध्ये आपण दुधाऐवजी अशुद्ध सेविणाऱ्या गोचिडाचा दाखला पाहिला. दुसरा दाखला चिखल सेवणाऱ्या बेडकाचा पाहिला. तिसरा आपल्याच घरात पुरुन ठेवलेल्या धनाबद्दल माहिती नसल्याने दारिद्र्याचे जीवन जगणाऱ्या दरिद्र्याचे उत्कृष्ट उदाहरणासह स्पष्टीकरण पाहिले. आता या चौथ्या ओवीत माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की, त्याप्रमाणे जेथे सर्व सुखांनी आराम करावा, असा मी आत्माराम हृदयात असताना अज्ञानी जिवांना क्षुद्रविषयोपभोगांची भूल पडते. आत्मसुख हेच सर्वश्रेष्ठ सुख होय. या व्यतिरिक्त असणारी सर्व सुखे ही दुःखमूलकच असतात. क्षणिक असतात. त्यापुढे इतर सुखे ही सुखेच नसतात. परमेश्वराव्यतिरिक्त असणाऱ्या सर्व सुखाकडे असणारी जिवांची धाव हीच त्यास परमेश्वरापासून दूर नेते. समर्थ रामदास स्वामी आपल्या मनाच्या श्लोकात म्हणतात,

**अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना।**
**अती काम त्या राम चित्ती वसेना।**
**अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा।**
**अती विषयी सर्वदा दैन्यवाणा।।६४।।**

**– मनाचे श्लोक**

भ्रांतासंबंधी एक अतिशय उत्कृष्ट कथा आहे. 'श्री नवनाथ भक्तिसार'



या ग्रंथात ही कथा प्रामुख्याने अ. क्र. २८ व २९ मध्ये आली आहे. ती भर्तरीनाथासंबंधी आहे. अवंती नगरीचा राजा भर्तरी व त्याची पट्टराणी पिंगला यांचे एकमेकावर अतिशय प्रेम असते. एकदा त्यांची एकमेकात थट्टा चालली असता भर्तरी पिंगलास म्हणाला, ''जर मी तुझ्या अगोदर मेलो, तर तू काय करशील?'' क्षणार्धात पिंगला म्हणाली, ''जर तुम्ही माझ्या आधी गेलात, तर तुमच्या चितेत मी स्वतःच्या प्राणांची आहुती देईन. तुमच्याशिवाय मी या जगात राहणार नाही.''

काही दिवसांनी भर्तरी शिकारीसाठी अरण्यात गेला त्याच्या मनात पिंगलेची परीक्षा पाहण्याची इच्छा झाली. त्याबरोबर त्याने एका हरणास ठार करून त्याच्या रक्तात आपली राजवस्त्रे, मुकुट, अलंकार भिजवले. एका सेवकाला बोलावून त्याच्याजवळ ते दिले. त्यास सांगितले की, ''हे पिंगला महाराणीस नेऊन दे आणि सांग की वाघाने राजास ठार केले. त्यांची ही वस्त्रे, अलंकार आपणास विश्वास वाटावा म्हणून आणली आहेत.''

सेवक राजाज्ञेनुसार अवंती नगरीत आला. त्याने पिंगला राणीस जसा भर्तरी राजाच हुकूम होता तसेच सांगितले. पिंगलेवर दुःखाचा डोंगर कोसळला. सारी प्रजा, इतर राण्या, सर्व दुःखी झाले. राणी पिंगलाने सेवकांना स्मशानात स्वतःची चिता रचायला सांगितले. त्या आज्ञेचे पालन सेवकांनी केले. अवंतीतील प्रजाजनांच्या उपस्थितीत पिंगलाने अग्नीत उडी घेतली. सर्वासमक्ष तिने अशा रीतीने प्राणत्याग केला. आधी राजा व नंतर महाराणी! दुःखाने हळहळत प्रजाजन घरी गेले.

आपला सेवक बराच वेळ झाला तरी परतला नाही म्हणून भर्तरी स्वतः अवंतीनगरीकडे आला. वेशीवरच त्याला समजले की, पिंगला महाराणी सती गेली. आपल्या जीवघेण्या थट्टेमुळेच आपली पट्टराणी आपणास सोडून गेल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने स्मशानाकडे धाव घेतली. चिता जळतच होती. राजा भर्तरीने त्याच चितेत प्राणत्याग करण्याचे

ठरविले. पण प्रजाजनांनी वेढ्यावर वेढे घालून त्यांना रोखून विनवले, 'तुम्ही राजे आमचे अन्नदाते. तुम्ही जगले पाहिजे' त्या विनंतीस मान देऊन राजा तेथेच बसून राहिला. भर्तरीस प्रजेने राजवाड्यात चलण्याविषयी हरप्रकारे समजाविले. पण राजाने ते मानले नाही. राजा स्मशानात बसून राहिला. पिंगलेच्या नावाचा जप करीत राहिला.

अशी बारा वर्षे उलटली. राजा भर्तरीचे शरीर कृश झाले. पण त्याने पिंगलेच्या नावाचा ना जप सोडला, ना तो स्मशान सोडून राजवाड्यात परतला. त्याच्या उद्धारासाठी गुरुदेव दत्तांच्या आदेशावरून महाराज गोरक्षनाथ अवंतीनगरीत आले. कुंभारवाड्यात जाऊन त्यांनी एक बाटलीसारखे मडके तयार करून घेतले. त्यास सजविले. ते मडके उराशी कवटाळून गोरक्षनाथ स्मशानात, जेथे भर्तरी होता, तेथे आले. त्याचे आपल्याकडे लक्ष आहे, असे पाहून जमिनीवर पडण्याचे नाटक गोरक्षांनी केले. गोरक्षनाथ पडल्याबरोबर ती बाटलीही फुटली. गोरक्षनाथांनी 'माझी सुंदर बाटली फुटली हो!' म्हणून आक्रोश करण्यास सुरुवात केली. वेगवेगळ्या रीतीने त्या बाटलीच्या सुंदरपणाचे वर्णन करून अमाप शोक करू लागले. ते पाहून राजा आश्चर्यचकित झाला. त्याचा पिंगलाचा नामघोष थांबला. भर्तरी राजाने गोरक्षनाथांना विचारले, ''काय झाले? इतके का तुम्ही रडता आहात?'' त्यावर आक्रोश करीतच गोरक्षनाथ म्हणाले, ''माझी अतिशय सुंदर बाटली फुटली. आता तीच मला कशी मिळेल? आणि तुम्ही का शोक करता?'' त्यावर भर्तरीने पिंगलेची गोष्ट सांगितली व म्हणाला, ''तुम्हाला शेकडो मडकी परत मिळवून देईन, पण पिंगले सारखे रत्न मला मिळणार नाही.'' त्यावर गोरक्षनाथ म्हणाले, ''तुझ्या पिंगलेसारख्या लक्षावधी पिंगला मी आणून दाखवीन.'' त्यावर भर्तरीने आव्हान दिले. गोरक्षनाथांनी पिंगलेच्या नावाने कामिनीअस्त्र जपले आणि भस्मचिमूट वर फेकली. त्याबरोबर पिंगलारूपात लक्षावधी महिला खाली उतरल्या. ते पाहून राजा थक्क झाला. त्यांना आपल्या



भोवती बसवून भर्तरी संसारखुणा विचारता झाला. त्यांनी त्या अचूक सांगितल्या. पुढे पिंगला भर्तरीस जे बोलली ते सांगताना नवनाथ भक्तिसारचे रचनाकार धुंडीसुत मालुकवी म्हणतात,

**म्हणती महाराजा प्राणेश्वरा। मम विरहाचे शल्य 'बसले अंतरा'।**
**परि अशाश्वताचा माथा भारा। फुकटपणी वाहिला।।९७।।**

**– अध्याय २९**

आसक्तीमुळे जिच्या नावाचा जप करीत भर्तरी बारा वर्षे स्मशानात बसला, गोरक्षनाथकृपेने प्रगट होताच, तीच पिंगला भर्तरीस सांगत आहे की तुम्ही जे शाश्वत नाही, त्या असाराचा भारा फुकटच डोक्यावरून वाहिला आणि सल्ला देते,

**तरी राया महीभोजा। आता संग सोडुनी माझा।**
**मोक्षमहीतळी ध्वजा। लावोनिया उभारी।।१००।।**

**यापरी माझा काम चित्ती। वरूनि आचरिला संसारनीती**
**परी मुक्तीमोक्षाची मांदुस हाती। चढणार नाही महाराज।।१०१।।**

– अ. २९

भर्तरीने गोरक्षनाथांचे पाय धरले. गोरक्षनाथ त्यास म्हणाले, ''तू सांगशील तसे होईल. पिंगलेसह तू संसारसुख भोगणार असशील तर ते तुला लाभेल. वैराग्य अंगी बाणवून ज्ञानामृतात राहणार असशील तर तसे होईल!'' भर्तरीची भ्रांती नाहीशी झाली होती. तो म्हणाला, ते मालुकवी धुंडीसुतांच्या शब्दात पहा,

**मी पूर्वीच भ्रांती वेष्टिलो। श्रीगुरूचे हातापासुनी निसटलो।**
**निसटलो परी कष्टलो। संसारतापाझारी।।११४।।** (अ.२९)

आणि आता मी भवभ्रांतीत राहणार नाही, असा निर्धार भर्तरीने

गोरक्षनाथांना सांगितला. त्याच्या सांगण्यानुसार गोरक्षनाथांनी सर्व पिंगला अदृश्य केल्या. पुढे ते भर्तरीनाथास आपल्या बरोबर घेऊन गेले.

अशा प्रकारे भ्रांताचा विषयावरील कामु असतो. ती भ्रांती फिटली की आत्मारामाची प्राप्ती होते.

आता मध्यवर्ती ओवीच्या पुढे जाऊन माऊली म्हणतात की, डोळ्यांनी मोठे मृगजळ पाहिले असता, अमृताचा गिळता घोट थुंकून टाकावा अथवा शिंप मिळाली असता गळ्यात बांधलेला परिस तोडून टाकावा, तसे जीव हृदयामधला राम सोडून क्षुद्र गोष्टींच्या भागे धावतात. हाता तोंडातले सोडून ज्यापासून काहीच शाश्वत लाभ होणार नाही, अशा भ्रामक बाबी अंगिकारून जीव स्वत:चे फार मोठे नुकसान करून घेतात. वाळवंटात किंवा मोकळ्या मैदानी प्रदेशात रखरखत्या उन्हात पाण्याच्या लाटा उसळल्याचा भास होतो. वास्तविक तेथे पाणी अथवा लाटा, असे काहीच नसते. त्याला प्राणी फसतात व त्यामागे धावून तृषार्त मरतात.

याठिकाणी मृगजळ म्हणजे इंद्रियांना उपभोगता येणाऱ्या क्षणिक सुखाच्या, दीर्घ दु:खाच्या अनेक बाबी होय. अमृताचा 'गिळिता गळाळा' म्हणजे अनेक अशा साधना की ज्या आत्मदर्शनापर्यंत घेऊन जातात. 'परीस' म्हणजे परमात्मास्वरूप तर 'शिंप' म्हणजे इंद्रियजन्य क्षुद्र उपभोग होय.

या दुर्लभ मानवी देहामध्ये 'आत्मा' नावाचा जो परीस आहे, त्याला कर्म-भक्ती-ज्ञान-योग आदि साधनांद्वारे ओळखून त्या आत्मस्वरूपाशी तादात्म्य पावून स्वस्वरूपात विलीन होऊन सच्चिदानंदमय होणे हे आपले परमकर्तव्य असताना, इंद्रियजन्य सुखाच्या शिंपी जमवून त्यातच धन्यता मानण्यात जीवात्मे नरदेह संपवित असतात. भक्तहो, मानवी देहाची प्राप्ती जेव्हा जिवास होतो, तेव्हाच त्यास प्रज्ञा-विवेक यांची अद्वितिय अशी देणगी मिळते. त्या देणगीच्या आधारे जसे की आताच सांगितले, विविध साधना करता येतात व परमेश्वरापर्यंत पोहचता



येते. हाच तो अमृताचा घोट होय. पण मृगजळावत खोट्या सुखांच्या मागे धावून जीव हा अमृताचा गिळता घोट थुंकून टाकून 'अमृतत्वाला' मुकतो. स्वत:तच असणाऱ्या परमात्मा स्वरूपाला डावलून तो देहाचे चोचले पुरवण्यात दंग होतो. म्हणजेच शिंपीने गळे सजविणे होय.

तथाकथित क्षुद्र करमणूकीच्या कार्यक्रमात पराकोटीचे गढून जाऊन आत्मज्ञानपर-भजन-कीर्तन-प्रवचन-अध्यात्मिक वाचन-श्रवण आदि बाबींसाठी दारे बंद करून ठेवणे, आत्मचर्चा, भक्ती इ. गोष्टीवर बोलण्याऐवजी गलिच्छ राजकीय गप्पागोष्टीत गढून जाणे एवढेच नव्हे तर त्यासाठी हाणामारी करणे, ही काही यासंदर्भातील व्यावहारिक उदाहरणे होत.

आता माऊली पुढील ओवीत स्पष्ट करताहेत की त्याप्रमाणे 'मी आणि माझे' या भ्रमात रमून गेलेले लोक अर्थात जीव माझ्याशी एकरूप होत नाहीत म्हणून जन्ममरणांच्या दुथड्या संसारनदीत गटांगळ्या खात राहिले आहेत.

या ओवींमध्ये परमेश्वरांनी आपणास राजगुह्य सांगितले आहे. जन्म आणि मरणाच्या दोन तिरांच्या मध्ये म्हणजे जन्म झाल्यापासून मरेपर्यंत आणि जन्मून पुन्हा मरेपर्यंत विविध प्रकारच्या दु:खांनी पिचत, कन्हत, कुंथत राहण्याचे कारण येथे उघड करण्यात आले आहे. ते म्हणजे अहंममतेचा पगडा आणि त्यामुळे परमेश्वर स्वरूपास प्राप्त न होणे हे होय.

'अहं' म्हणजे 'मी आणि माझे'. हा मीपणा नष्ट झाला की परमेश्वराची आणि आपली भेट होण्यास क्षणाचाही विलंब नाही. पण नेमकी हीच गोष्ट आपणास अनंत जन्मात साध्य होत नाही. 'अहं' ही प्रवृत्ती जाऊन 'सोहं' मी तो आहे - मी आत्मा आहे - तोच परमात्म्याचा अंश आहे. म्हणजे मी मी नसून तो परमात्मा आहे, अशी धारणा होणे गरजेचे आहे. 'अहं'मध्ये जे काही येते ते सारे बांधणारेच येते. हा देह माझा आहे. देहानुषंगिक इतर

सर्व अवयव माझे आहेत. माझे घर, माझी शेतीवाडी, माझी संपत्ती, माझी बायको-पोरे, मी केले, मला मिळालेच पाहिजे इ. अशी जी धारणा असते, त्याऐवजी परमात्म्याचा अंश जो जिवात्मा तो मी आहे. म्हणजे मी ते परमात्मा आहे. तोच असल्याने मी नाहीच, सारे तोच आहे. माझे वेगळे असे काहीच अस्तित्व नाही, अशी धारणा व्हायला हवी. प्रकृतीच्या गुणांना स्वत:वर ओढून घेऊन 'हे मी केले' असे म्हणून अहंममतेचा पगडा दृढ करून घेतो. सांसारिक सुखातच गढून गेल्याने भक्ती घडत नाही. वैराग्य प्राप्त होत नाही. त्यामुळे सद्‌गुरूकृपाप्राप्ती होत नाही. त्यांची कृपा नसल्याने आत्मरूपाची प्राप्ती होत नाही. अर्थात, श्रीहरी भेटत नाही. परमेश्वर भेटला नाही म्हणजे जन्म-मृत्यु हे दोन किनारे व त्यामधील 'डहूळण्याची' वेदना काही संपत नाही. नाकातोंडातून पोटात पाणी जाऊन किंवा थंडीने गारठून किंवा मगरीने देहास खाल्ल्यामुळे मरणाचा किनारा कधी प्राप्त होईल, हेही सांगता येत नाही. त्यासाठी 'अहं' ममतेचा पगडा उठला पाहिजे. श्रीहरी भेटला पाहिजे. समर्थ रामदास स्वामी आपल्या 'आत्माराम' ग्रंथात म्हणतात,

**तू समर्थाचे लेकरू। अभिमाने घेतला संसारू।**
**अभिमान टाकिता पैलपारू। पावशील बापा।।२८।।**

**ईश्वरापासून जालासी। परी तू तयासी चुकलासी।**
**म्हणोनि हे दु:ख भोगिसी। वेगळेपणे उत्कट।।२९।।**

**- आत्माराम, स. पहिला**

अहंममता कशी असते, त्यामुळे जवळ असलेली 'आत्मप्राप्ती' कशी दुरावते याचे एक उदाहरण श्री. हेमाड महाराजांच्या श्रीसाई सच्चरित्राच्या अध्याय क्र. १६ व १७ मध्ये आले आहे. ती मोठी उद्‌बोधक गोष्ट असल्याने येथे प्रगट करीत आहे.

एक भावार्थी परंतु धनसंचयात निमग्न असलेला अतिश्रीमंत गृहस्थ



होता. गर्भश्रीमंत असल्याने घरी कशाचीही वाण नव्हती. एकदा त्याच्या मनात आले, चहुमुलखात ख्यातकीर्त असलेल्या विद्यमान संतश्रेष्ठ साईबाबांच्या दर्शनास जावे. कोणी काय कोणी काय मागतो. आपणास कशाचीच उणीव नाही. आपण त्यांना ब्रह्मज्ञान मागू म्हणजे साक्षात ब्रह्माचीच मागणी करू. असा विचार करून ते श्रीमंत गृहस्थ शिर्डीत आले. त्यांनी साईनाथांच्या चरणावर मस्तक ठेवून साईनाथांना नमन केले आणि म्हणाले, ''बाबा, मला ब्रह्म दाखवा. एवढी एकच जिज्ञासा घेऊन मी इतक्या दूर अंतरावरून येथे आलो आहे. मला शीणही फार झाला आहे. ते ब्रह्म जर मला मिळाले तर मी कृतकृत्य झालो असे म्हणेन!''

त्यावर साईबाबा त्या श्रीमंत गृहस्थास म्हणाले, ''तू चिंताच करू नको. येथे उधारीचा व्यवहारच नाही. तुला येथे आता रोख ब्रह्म दाखवितो. अरे, तुझ्यासारखा ब्रह्म मागणारा भाविक फारच दुर्मिळ! कोणी धनसंपदा मागतो, कोणी रोगसंकटे निवारा असे सांगतात. कोणी कीर्ती-राज्यपद मागतात. फक्त ऐहिक सुखासाठी सारेजण शिर्डीस माझ्यासारख्या फकिराकडे धाव घेतात. तुझ्यासारखा ब्रह्म मागणारा दुर्मिळ आहे!''

थोड्या वेळाने साईनाथांनी एका मुलास जवळ बोलाविले. तो श्रीमंत गृहस्थ तेथे शेजारी बसूनच होता. त्याच्यासमोर त्या मुलग्यास बाबांनी म्हटले, ''लवकर जा! त्या नंदूला निरोप दे. त्याला म्हणावे बाबांना पाच रुपयांची अतिशय गरज आहे. काही वेळातच ते तुझे पैसे परत करतील.'' श्री साईनाथांच्या आज्ञेनुसार तो मुलगा तात्काळ धावतच गेला. थोड्या वेळाने परत आला. त्याने सांगितले की, नंदूच्या घराला कुलूप आहे.'' लगेच श्री साईबाबा त्यास म्हणाले, ''बाळा वाणी घरात असेल त्याच्याकडे जा आणि तोच निरोप त्यास दे!'' लगेच मुलगा धावत गेला. बाळाही तेव्हा घरी नव्हता. मुलगा परतला. आणखी एक दोन ठिकाणी बाबांनी त्या मुलग्यास पाठविले. मुलगा हेलपाट्यापायी दमून गेला. पण एक पैसाही लाभला नाही.

खरे म्हणजे, चालते बोलते ब्रह्म असलेले श्री साईनाथ महाराज पाच रुपयास अडतीलच कसे? ते अंतर्ज्ञानी असल्याने जो घरात नाही त्याच्याच घरी पाच रुपयांसाठी ते त्या भाग्यशाली मुलग्यास पाठवत होते. त्या ब्रह्मदर्शनोत्सुक श्रीमंत गृहस्थांना उपदेश देण्यासाठीच श्री साईनाथांनी हा खेळ, त्याच्यासमोर चालविला होता. समोर अन्यही अनेक भक्तजन येत जात होते. त्या ब्रह्मार्थी श्रीमंत गृहस्थाच्या निमित्ताने अन्य भक्तांनाही उपदेश मिळावा, हा श्री साईनाथांचा उद्देश होता.

त्या श्रीमंत सद्गृहस्थाच्या खिशात त्यावेळी रुपये दोनशे पन्नासाचे पुडके होते. परंतु त्यातील रु. पाच श्री साईबाबांना त्यांच्या गरजेसाठी, ते ही अल्पकाळ द्यावेत, असे त्यास वाटले नाही. कारण ते परत मिळतील किंवा नाही, याबाबतचा शंकाकल्लोळ त्याच्या मनात उठला होता. जो ब्रह्मासाठी इतका तान्हेलेला होता त्यास पाच रुपयांचा लोभ सोडवत नव्हता. इतर कोणी भोळाभाबडा भक्त असता तर त्याने तात्काळ त्याच्या जवळचे पाच रुपये श्रीसाईचरणी समर्पित केले असते. पण त्या गृहस्थावर अहंममतेचा म्हणजे मी व माझे, असा पगडा होता. त्यामुळे त्या धनमोह्याला स्वत:चे पाच रुपये उसने द्यायचा धीर झाला नाही.

तेथेच हे सारे पाहत बसून असलेल्या त्या ब्रह्मदर्शनोत्सुक श्रीमंत गृहस्थाला परत जायचीही घाई झाली. तो श्री साईनाथांना म्हणाला, ''अहो बाबा, ब्रह्म दाखवा की!'' तेव्हा श्री साईबाबा म्हणाले, ''आतापर्यंत बसल्या जागीच तुम्हाला ब्रह्म दाखवण्यासाठी जे जे उपाय केले ते तुम्हाला कळले नाहीतच का?'' असे म्हणून त्या गृहस्थाला निमित्त करून श्री साईनाथ ब्रह्मज्ञानाचा उपदेश सर्वांसाठी करू लागले. तो त्यांच्या श्रीमुखातून प्रगटणरा अमृतोपदेश सांगताना श्री. हेमाड महाराज म्हणतात,

**ब्रह्मालागी पंचप्राण। पंचपंचेंद्रियज्ञान।**
**अहंकार बुद्धी मन। लागती समर्पण करावया।।७३।।**



**हिरण्यगर्भापर्यंत। सर्व उत्कर्षी जो विरक्त।**
**तोचि ब्रह्मविद्येसी अधिकृत। अनासक्त इतरत्र।।७५।।**

**– श्री. हेमाड विरचित श्री साईसच्चरित्र, अ. १६ वा**

अशा प्रकारे ज्ञानोपदेश करीत करीत साईनाथ अचानक त्या गृहस्थास म्हणाले, ''तुमच्या खिशात रुपये दोनशेपन्नास आहेत. ते बाहेर काढा. तेच तुमचे ब्रह्म गुंडाळे आहे.'' त्या श्रीमंत गृहस्थाने खिशात हात घातला. नोटांचे पुडके बाहेर काढले. मोजले. रक्कम तंतोतंत आढळली. श्री साईनाथ केवढे अंतर्ज्ञानी आहेत. तो गृहस्थ थक्क झाला. त्याने उठून श्री साईचरणी माथा ठेवला. आशीर्वाद मागितले. त्यावेळी श्री साईबाबा जे म्हणाले, ते श्री. हेमाड महाराजांच्या शब्दात पाहा,

**मग बाबा म्हणती ते वेळे। गुंडाळ आपले ब्रह्मगुंडाळे।**
**लोभाचे जाहल्यावीण वाटोळे। ब्रह्म न मिळे तुजलागी।।६६।।**

**– श्री साईचरित्र, अ. १७ वा**

प्रत्यक्ष सद्गुरुसमोर असतानासुद्धा ज्या गृहस्थाचे 'मी आणि माझे' धन ही अहंममता, धनलोभ सुटला नाही तो ब्रह्म या सर्वोच्च लाभापर्यंत कसा पोहचेल? तरीपण सर्वांना लाभ व्हावा, म्हणून श्री साईनाथांनी अमृतमय ब्रह्मनिरूपण पुढेही केले आहे.

अशा प्रकारे 'अहंममतेच्या लवडसवडी' बिचारा जीव हा परमेश्वरास पावत नाही. त्यामुळे जन्म-मरणाचा फेरा चुकत नाही. त्यामुळे अटळ दु:खे भोगणेही टळत नाही.

'तैसा हृदयामध्ये मी रामु' या मध्यवर्ती ओवीच्या नंतरच्या अखेरच्या ओवीत, म्हणजे ६३ क्र. च्या, सातव्या ओवीत परमेश्वर स्वस्वरूपाचे व्यापक-विलक्षण-दिव्य असे प्रगटीकरण करीत आहेत. ते म्हणतात एऱ्हवी मी कसा आहे, पाहणाऱ्याला जसा सूर्य तोंडासमोरच दिसतो

तसा. पण केव्हा दिसतो केव्हा नाही असा उणिवेचा मात्र नाही.

आपले ग्रहमंडळ आणि आपला सूर्य, अशी अनंत ग्रहमंडळे आणि सूर्य या ब्रह्मांडात आहेत, हे आपणास ज्ञात आहेच! तर हा आपला सूर्य, जो त्याच्याकडे पाहील त्याला तो त्याच्या तोंडासमोरच दिसतो. मग ती पाहणरी व्यक्ती भारतातील असो वा अमेरिकेतील असो. त्या सूर्याप्रमाणेच मी सर्वांना सदा सन्मुख आहे, असे भगवंत म्हणतात. पण हा आपला सूर्य कधी दिसतो न दिसतो. म्हणजेच पूर्व गोलार्धात दिवस असतो तेव्हा पश्चिम गोलार्धात रात्र असते. त्यामुळे पूर्वेत तो दिसतो तर पश्चिमेत तो दिसत नाही. काही जागी आकाशात काळ्या ढगांची दाटी झाल्यानेही तो अल्पकाळ दिसत नाही. तो दिसत नाही म्हणून तो नसतो, असे नाही. तर तो अखंड तळपतच असतो. पण पृथ्वीवरील प्राणीमात्रांना मात्र काही काळ तो दिसण्या न दिसण्याची स्थिति अनुभवावी लागते. त्यांच्या दृष्टीने ही एक उणीव असते. पण परमेश्वर हा, ही उणीवरहीत असतो. तो विश्वव्यापी अखंड स्थितीचा सदैव सदा-समस्थितीचा असतो. त्याचे तेज जसेच्या तसेच असते. तो कमी-जास्त होत नसतो. एवढा अखंड तेजाने तळपणारा, सदैव असणारा परिपूर्ण असा परमेश्वर हृदयामध्ये असूनही जिवांना तो अनभिज्ञ राहतो, हे केवढे आश्चर्य!

सारांश बोलायचे तर, परमेश्वराच्या 'अहं' म्हणजे असणेपणाच्या जाणिवेतून प्रचंड ऊर्जा निर्माण झाली. म्हणजेच महद्ब्रह्म निर्माण झाले. त्यातून पंचमहाभूतात्मक ८४ लक्ष जीवयोनींची निर्मिती झाली. अर्थात हे सर्व परमेश्वरी सत्तेवर निर्माण झाले. त्या जीवयोनीतील सर्वश्रेष्ठ प्राणी म्हणजे मानव होय. त्यास बुद्धी-विवेकाची प्रचंड अशी देणगी लाभल्याने अखंड सृष्टीवर त्याचे अधिराज्य त्यास स्थापित करता आले. परमेश्वराच्या अंशामुळे म्हणजेच जिवात्म्यामुळे तो परमेश्वराशी इतर प्राण्यासारखाच जोडला गेला आहे. परंतु विवेक-बुद्धीच्या अतिरिक्त देणगीमुळे तो परमेश्वरी ज्ञान, भक्ती आदि विविध अध्यात्मिक साधनांद्वारे प्राप्त करू



शकतो. त्याद्वारे तो परमेश्वरास प्राप्त होऊन जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटून आपल्या मूळ सच्चिदानंदस्वरूपात राहू शकतो. अहंच्या पाशात गुंतलेल्या भ्रांत जीवांनी क्षणिक सुखोपभोगाच्या मायिक बाबीत गुंतून श्रांत होण्याऐवजी, क्रांत होऊन अध्यात्मज्ञान मार्गाची अविश्रांत वाटचाल करून आपल्या स्वस्वरूपात पोहचून, चिरविश्रांत होणे, हे अर्थात परमकल्याणकारी होय!

पुंडलिका वरदे हरी विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम श्री गुरुदेव दत्त।।
।। ॐतत सत्।। ॐ तत् सत्।। ॐ तत् सत्।।

(हे प्रवचन सर्वप्रथम इटकरे, ता. वाळवा, जि. सांगली या आपल्या स्वग्रामी, १९ मार्च, १९९८ रोजी श्री हनुमान मंदिर (उत्तरेचे) येथे श्रीमद् ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सप्ताहांतर्गत देण्यात आले.)